Peer Reviewed Referred
and UGC Listed
Journal No. 47026

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL


ISO 9001 : 2015 QMS
ISBN / ISSN

# IDEAL

Single Blind Review/Double Blind Review

Volume - XII, Issue - II
March - August - 2024
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2023 - 7.537
www.sjifactor.com



Ajanta
Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | सद्यस्थितीत एकल महिला सक्षमीकरण काळाची गरज<br>**कु. रोहिणी दत्तात्रय सोनवणे**<br>**प्रा. डॉ. बाभुळगावकर किशन एस.** | १-६ |
| २ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : मराठी साहित्य, भाषेचे महत्त्व आणि रोजगाराच्या संधी<br>**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे** | ७-११ |
| ३ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ग्रंथालय आणि ग्रंथपालाची भूमिका<br>**डॉ. दिलीप गोविंदा पाटील** | १२-१७ |
| ४ | राज्यशास्त्रातील रोजगाराच्या संधी<br>**डॉ. नामानंद गौतम साठे** | १८-२३ |
| ५ | तंत्रज्ञानाष्ठित शिक्षण<br>**प्रा. तरटे शरद कचरु** | २३-२७ |
| ६ | शेतकऱ्यांसाठी विकसीत आर्थिक शिक्षणाचा उत्पन्न वाढीवरील परिणाम<br>**खराडे वैभव जगन्नाथ**<br>**डॉ. कुमावत ए.एस.** | २८-३१ |
| ७ | तमाशा पंढरी : नारायणगाव<br>**डॉ. रविशा धनराज टाक** | ३२-३४ |
| ८ | नवीन शैक्षणिक धोरण २०२०मधील उच्च शिक्षणापुढील संधी व आव्हाने<br>**लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव** | ३५-३९ |
| ९ | विद्यार्थी हिताच्या दृष्टीने शैक्षणीक धोरण २०२० महत्त्व<br>**डॉ. राम फुन्ने** | ४०-४३ |
| १० | परिवर्तनशील शैक्षणिक धोरण २०२०<br>**डॉ. भालेराव जी. पी.** | ४४-४६ |
| ११ | राष्ट्रीय शिक्षण धोरण : मराठी साहित्य, भाषेचे महत्व आणि रोजगाराच्या संधी<br>**प्रा. डॉ. अंशुमती राजेंद्र काहाणे** | ४७-५२ |
| १२ | भारतातील शैक्षणिक धोरण<br>**प्रा. डॉ. सूर्यकांत नागनाथ कळसकर** | ५३-५९ |

# ३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ग्रंथालय आणि ग्रंथपालाची भूमिका

**डॉ. दिलीप गोविंदा पाटील**
ग्रंथपाल, को. ए. सो. लक्ष्मि-शालिनी महिला महाविद्यालय, पेझारी, ता-अलिबाग, जिल्हा-रायगड.

**सारांश**

"आधुनिक भारतात शिक्षणाची सुरुवात, भारतातील इंग्रजी राजवटीत झाली. त्यापूर्वी भारतात गुरुकुल शिक्षणपद्धती होती. गुरुकुल शिक्षणपद्धतीत शिक्षणाचे केंद्र म्हणजे आश्रम, मठ होते. आणि निसर्गाच्या सान्निध्यात शिक्षण दिले जात होते. ऋषी-मुनी आणि धार्मिक संत हे त्याकाळी आपल्या शिष्यांना उपदेश देवून एक प्रकारे अध्यापनाचे कार्य करीत होते. त्याकाळी ग्रंथ निर्मितीचे कार्य हे हाताने लिहून केल्या जात होते. त्यामुळे अश्या ग्रंथाना हस्तलिखिते म्हटले जात होते. त्याकाळी गुरु म्हणजे आजचे अध्यापक होते. गुरु आपल्या मधुर वाणीतून शिष्यांना गुरुमंत्र व ज्ञान देत होते आणि शिष्य ते ज्ञान विशिष्ट प्रकारच्या पानावर आणि कपड्यावर, ताडपत्रावर शाईने लिहित असायचे. अश्या प्रकारे ग्रंथनिर्मितीचे कार्य होत असे. या ग्रंथ निर्मितीला अनेक महिने, अनेक वर्ष लागायचे. त्यामुळे ग्रंथाच्या मर्यादित प्रती असत. त्याकाळात ग्रंथाच्या मर्यादित प्रती असल्यामुळे ग्रंथाच्या उपयोगापेक्षा ग्रंथाच्या सुरक्षिततेला महत्व दिले जायचे. अनेक वर्ष ही एक प्रकारची परंपरा सुरु होती. ई.स. चौदाव्या-पंधराव्या शतकात गुटेनबर्ग या शास्त्रज्ञांने मुद्रणकलेचा शोध लावला. त्यानंतर त्यात अनेक संशोधन होवून मुद्रणाच्या कार्यात गती आली आणि छापील ग्रंथ निर्मितीला प्रारंभ झाला. तेव्हापासून एका ग्रंथाच्या अनेक प्रती छापायला सुरुवात झाली. त्यानंतर ब्रिटीश शासन भारतात आले. त्यांनी स्वत:च्या सोयीसाठी प्रारंभी शिक्षणाची सुरुवात भारतात केली. हळूहळू ग्रंथालय ही संकल्पना अस्तित्वात आली. ग्रंथालय चळवळी मुळे संपूर्ण देशात सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापन होवू लागली. त्यानंतर ब्रिटीश राजवटील भारतात तीन विद्यापीठे स्थापन करण्यात आले. स्वाभाविकच तीनही विद्यापिठात, विद्यापीठ स्तरावरील ग्रंथालय स्थापन झाली. त्यात डॉ. एस.आर. रंगनाथन हे मद्रास विद्यापीठाचे प्रथम विद्यापीठ ग्रंथपाल म्हणून होते. त्यांनी शैक्षणिक ग्रंथालय, सर्वाजनिक ग्रंथालय, आणि विशेष ग्रंथालय ह्या संकल्पना निर्माण केल्या. ग्रंथालयाचे हे तीन प्रमुख प्रकार समजले जाते. हे प्रकार संबंधित ग्रंथालयाचा वाचकवर्ग, ग्रंथालयाचे कार्य, उद्दिष्टे या आधारावर पाडले गेले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शैक्षणिक सुधारणा व उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता ठेव्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग स्थापन करण्यात आला. त्यानंतर अनेक समित्या व आयोग स्थापन करण्यात आले. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात सुधारण्य करण्यासाठी अनेक उपाय योजना सुचविल्या व त्या अमलात आणण्याचा प्रयत्न केला. या सर्वामध्ये अनेक सुधारणाबरोबरच ग्रंथालयाला विशेष महत्व देण्यात आले. ज्ञानी, जागरूक समाज बनविण्यासाठी प्रयत्न झाले. त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या नेतृत्वात सन १९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अमलात आणले. त्यांत शिक्षणाच्या अनेक पायाभूत गोष्टी वर भर

देण्यात आला होते. त्यानंतर सध्याच्या सरकारने नवीन राष्ट्रीय धोरण जाहीर केले. त्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्यावर भर दिला जात आहे. प्रस्तुत लेखामध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ग्रंथालय व ग्रंथपालाची भूमिका स्पष्ट केलेली आहे."

**प्रस्तावना**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी वर्तमान केंद्र सरकारने एक समिती स्थापन केली. व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. या समितीचे अध्यक्ष इस्रो, बंगलोर चे माजी संचालक के. कस्तुरीरंगन हे आहेत. तसेच या समितीमध्ये वसुधा कामत, मंजुळ भार्गव, राम शंकर कुरील, टी. व्ही. कट्टीमनी, कृष्ण मोहन त्रिपाठी, मझहर असिफ, एम.के. श्रीधर तसेच सचिव म्हणून शकीला टी. शमसु हे या समितीत होते. त्यानंतर मसुदा समित्तीचे सदस्य म्हणून मंजुळा भार्गव, के. रामचंद्रन, अनुराग बेहर व लीना चंद्रन वाडिया यांनी काम केले. या समितीने भारताला केंद्रस्थानी मानून अश्या नवीन शिक्षण प्रणालीची कल्पना केली की, जी सर्वाना उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय व चैतन्यमय ज्ञानी समाजामध्ये परिवर्तीत करण्यात थेट योगदान देण्याची दूरदृष्टी ठेवेल. भारतामध्ये २०२० साली नवे शैक्षणिक धोरण आले, जवळपास तीन वर्षांनी त्याची अंमलबजावणी महाराष्ट्रात होत आहे. या धोरणामध्ये 'एंट्री आणि एक्झिट' हा असा पर्याय दिला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची नवी वाट खुली होणार आहे. सध्या शिक्षण जगतात चर्चा आहे ती राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची. कारण भारतात २०२० मध्ये नवे शैक्षणिक धोरण आले. त्यानंतर त्यावर बऱ्याच चर्चा, मत-मतांतरे झाली, काही शिक्षण तज्ज्ञांनी विरोध केला तर काहींनी पाठिंबा दिला. अखेर आता हळूहळू या धोरणाची अंमलबजावणी होत आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्रातल्या सर्व विद्यापीठांनी आणि पर्यायाने महाविद्यालयांनी हे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे यातील नियमानुसार आता शिक्षणव्यवस्थेत बदल घडताना दिसणार आहे. हे धोरण इतके व्यापक आहे की, परिणामी मोठे बदल आपल्याला स्वीकारावे लागणार आहेत. जून २०२३ पासून अंमलबजावणी झालेल्या धोरणामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात म्हणजेच राज्यातील सर्व विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये ते स्वीकारण्याची आणि समजून घेण्याची प्रक्रिया सुरु आहे आणि ती काही काळ सुरूच राहणार आहे. तूर्तास पदव्युत्तर अभ्यासक्रमात पहिल्या वर्षी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपासून या धोरणाची अंमलबजावणी होणार आहे. हळूहळू सर्वच अभ्यासक्रम नव्या धोरणानुसार चालवावे लागणार आहेत. यामध्ये बरेच बदल आपल्याला दिसतात, ज्यामध्ये परीक्षा, क्रेडिट सिस्टम, गुणांची विभागणी, अभ्यासक्रम यामध्ये मोठे बदल झालेले दिसतील. क्रेडिट पद्धतीत महत्वाचा बदल होणार आहे ते म्हणजे 'एकसमान क्रेडिट पद्धती. याकडे पदवीच्या पहिल्यावर्षी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना क्रेडिट गुणांकन पद्धतीनुसार अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. म्हणजेच प्रत्येक विषयाचे क्रेडिट निश्चित केले जाणार आणि यात एकसमानता आणली जाणार. म्हणजे राज्यातील सर्व विद्यापीठाच्या महाविद्यालयात विषयांचे क्रेडिट एकसमान असणार आहे

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील संक्षिप्त माहिती**

**शालेय शिक्षण**

प्रारंभिक बाल्यावस्थेततील शिक्षणाच्या संदर्भात सदर धोरण प्रारंभिक वर्षाच्या महत्वावर भर देते. आणि २०२५ वर्षापर्यंत ३ ते ६ वयोगटातील सर्व मुलांना प्रारंभिक बाल्यावस्थेततील दर्जेदार निगा व शिक्षण दिले जात असल्याची दक्षता घेते. हे या धोरणाचे उद्दिष्टे आहे. याकरिता नवनवीन उपक्रम राबविण्याची योजना या धोरणामध्ये आहे. ३ते ६ या सर्व वयोगटातील सर्व मुलांसाठी मोफत व सक्तीचे दर्जेदार शिक्षण उपलब्ध होत असल्याची दक्षता घेण्यासाठी शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ चा विस्तार करण्यात

येईल. असे स्पष्ट केले आहे. इयत्ता पहिली ते पाचवी मध्ये प्रारंभिक भाषा व गणित यांच्याकडे विशेष ध्यान पुरवले जाईल. सन २०२५ पर्यंत इयत्ता पाचवी व त्या पुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व अंकज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेणे हे या धोरणाचे उद्दिष्टे आहे. अभ्यासक्रम व अध्यापनाच्या बाबतीत शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्वावर आधारित एक अभिनव विकासात्मक दृष्ट्या योग्य अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे.

- **पायाभूत स्तर :** वय ३ ते ८ वर्षे – शीघ्र बौद्धिक विकास, खेळ, व शोधानावर आधारित अध्ययन.
- **तयारीचा स्तर :** वय ८ ते ११ वर्षे –खेळ, शोधन यावर आधारित बांधणी व रचनात्मक अध्ययनाकडे संक्रमणाची सुरवात.
- **मधील स्तर :** ११ ते १४ वर्षे –विषयांमधील संकल्पना शिकणे.
- **दुसरा स्तर :** १४ ते १८ वर्षे –उदरनिर्वाह व उच्च शिक्षणासाठी तयारी.

शाळांमध्ये विज्ञान, कला, भाषा, क्रीडा, गणित इत्यादी सर्व विषयावर समान भर देताना व्यावसायिक व शैक्षणिक शाखांचे एकीकरण करण्यात येईल. किमान इयत्ता पाचवी पर्यंत किंवा शक्यतो आठवीपर्यंत शिक्षण स्थानिक मातृभाषेत असेल. गरजेनुसार लवचिक भाषा अमलात आणण्यात येतील. संपूर्ण देशभरातून त्रीभाषीय सूत्र राबविण्यात येईल. वैश्विक प्रवेशाबाबत सन २०३० पर्यंत विविध उपाययोजनांच्या माध्यमातून सर्व शालेय शिक्षणामध्ये १०० टक्के ग्रास एनरोल्मेंट रेशो(म्हणजे एकूण विध्यार्थ्यपैकी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुणोत्तर) आत्मसात करणे, हे या धोरणाचे उद्दिष्टे आहे. न्याय व सर्वसमावेशक शिक्षणाच्या बाबतीत, जन्म व कौटुंबिक पार्श्वभूमी यांच्याशी निगडीत परिस्तिथीमुळे कोणतेही मुल शिकण्याच्या व प्रगतीच्या एकही संधीला मुकणार नाही याची हमी देण्यासाठी या धोरणामध्ये अनेक नियोजित उपाययोजना आहेत. यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी विशेष शिक्षण झोन देखील उभाण्यात येतील. असे स्पष्ट केले आहे. शालेय अनुशासनच्या संदर्भात शाळांची व्यवस्था व आयोजन संकुलामध्ये (शालेय संकुल म्हणजे १०-२० शासकीय शाळांचा समूह) करण्यात येईल. अनुशासन व प्रशासन यांचे हे मुलभूत एकक असेल. याद्वारे सक्षम व्यावसायिक शिक्षक समुदायासोबतच पायाभूत सुविधा, शैक्षणिक सुविधा (उदा. ग्रंथालये), मनुष्यबळ (उदा. संगीत व कला शिक्षक) अश्या सर्व प्रकारच्या साधनाची उपलब्धता होत असल्याची दक्षता घेण्यात येईल. गरजेनुसार व शक्य असेल तिथे उच्च दर्जाची पाठ्य पुस्तके स्थानिक भाषेत उपलब्ध करून देण्यात येतील.

**उच्च शिक्षण**

उच्च शिक्षण प्रणाली मध्ये आमुलाग्र बदल करणे, देशभरात जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्था निर्माण करणे, सन २०३५ पर्यंत ग्रास एनरोल्मेंट रेशो ५० टक्क्यापर्यंत वाढविणे. सर्व संस्था विद्यापीठे असतील किंवा पदवी प्रदान करणारी स्वायत्त महाविद्यालये असतील. नवीन संरचना, विशाल, सर्वसाधनसमृद्ध, चैतन्यमय बहुविध शाखांनी सुसज्ज संस्थाद्वारे उच्च शिक्षणासाठी नवीन दूरदृष्टी व संरचना परिकल्पित करण्यात आली आहे. उदारमतवादी शिक्षण विज्ञान, कला, मानवतावाद गणित व व्यावसायिक क्षेत्राचा एकात्मिक

व सखोल अनुभव मिळण्याच्या उद्देशाने पदवीपूर्व स्तरावरील व्यापक स्वरूपाचे उदारमतवादी कला शिक्षण अंमलात आणण्यात येईल. यामध्ये कल्पनाविलासी व लवचिक अभ्यासक्रमाची रचना, अभ्यासाचे कल्पक संयोजन व्यावसायिक शिक्षणाचे एकीकरण आणि बहुविध प्रवेश / प्रस्थान बिंदू असतील. संस्थांचे अनुशासन शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक स्वायत्तेवर आधारित असेल. प्रत्येक उच्च शिक्षण संस्था एका स्वतंत्र मंडळाकडून प्रशासित असेल.

शिक्षक शिक्षणाच्या बाबतीत, शिक्षक सज्जता कार्यक्रम अतिशय कसून घेण्यात येतील. आणि सदर कार्यक्रम चैतन्यमय, बहुविध शाखांनी सुसज्ज असलेल्या उच्च शिक्षण संस्था मध्ये राबविण्यात येतील. बहुविध शाखांनी सुसज्ज असलेल्या या उच्च शिक्षण संस्थामध्ये स्तरानुसार, विषयवार राबविण्यात येणारा व एकीकरण केलेला ४ वर्षाचा बॅचलर ऑफ एज्युकेशन हा अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी संपादन करणे हा शिक्षक होण्याचा प्रमुख मार्ग असेल. दुय्यम दर्जाच्या व अकार्यक्षम शिक्षक शिक्षण संस्था बंद करण्यात येतील. असे सुचविण्यात आले आहे. पदवीपूर्व पदवीचा कालावधी ३ ते ४ वर्षाचा असू शकेल. या दरम्यान च्या कालावधीत संस्था विद्यार्थ्यांना योग्य प्रमाणपत्र प्रदान करून अनेक बहिर्गमन मार्ग व संधी उपलब्ध करून देवू शकतात. पसंतीनुरूप क्रेडीट प्रणाली मध्ये (चॉइस बेस्ड क्रेडीट सिस्टीम) लवचिकता व नाविन्य यावे यासाठी सुधारणा करण्यात येतील. पेशाविषयक शिक्षणाच्या संदर्भात, सर्व प्रकारचे पेशाविषयक व व्यावसायिक शिक्षण उच्च शिक्षण प्रणालीचा अविभाज्य घटक असेल. स्वतंत्र तांत्रिक विद्यापीठे, आरोग्यशास्त्र विद्यापीठे, विधी व कृषी विद्यापीठे, किंवा या क्षेत्रातील किंवा तत्सम इतर क्षेत्रातील संस्था बंद करण्यात येतील. व्यावसायिक शिक्षण सर्व प्रकारच्या शिक्षणाचा अविभाज्य घटक असेल. संपूर्ण देशभर संशोधन व नवकल्पना या गोष्टीचा प्रसार वेगाने व्हावा या हेतूने नवीन संस्थांची स्थापना करण्यात येईल. वर्गातील शिक्षण प्रक्रिया सुधारण्यासाठी, शिक्षकांच्या व्यावसायिक विकासास सहाय्य करण्यासाठी, वंचित गटांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या संधी वाढविण्यासाठी आणि शैक्षणिक नियोजन, प्रशासन व व्यवस्थापन सुसुत्रब्ध करण्यासाठी शिक्षणाच्या सर्वच स्तरावर योग्य पद्धतीने तंत्रज्ञान समाविष्ट करणे, हे या धोरणाचे उदिष्टे आहेत. युवकांमध्ये व प्रौढांमध्ये १०० टक्के साक्षरता साध्य करणे तसेच सर्व भारतीय भाषांचे संवर्धन, वृद्धी व चैतन्य अबाधित राहील हे सदर धोरण सुनिश्चित करेल. तसेच देशाचे पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग स्थापन करण्यात येईल. आणि हा आयोग भारतातील शैक्षणिक दूरदृष्टीचा परिरक्षक असेल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ग्रंथालयाची भूमिका**

कोणत्याही समाजाचे अस्तित्व टिकविण्यासाठी व त्याचा विकास होण्यासाठी अनेक गोष्टीची आवश्यकता असते. त्यापैकी ग्रंथालय आणि शिक्षण या अतिशय आवश्यक अश्या दोन सामाजिक संस्था आहे. एकमेकाशी अतिशय जवळच्या अश्या दोन संस्था शिक्षण क्षेत्रात सेवा देण्याचे कार्य त्या करतात. म्हणूनच त्या एकमेकीना पूरक आहेत. कारण, ग्रंथालयाच्या मदतीने शिक्षणाचा प्रसार होतो व शिक्षणामुळे ग्रंथालयाचा प्रसार वाढतो. संपूर्ण मानवी इतिहासामध्ये शिक्षण व ग्रंथालये यांचा एकत्रित विकास झालेला दिसतो. ज्या ठिकाणी ग्रंथालयाची व ग्रंथालय सेवेची उणीव असते तेथे शिक्षणाचा अभाव असतो. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये

गुणवत्तेला व विध्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला व त्यांच्या शैक्षणिक स्वातंत्र्याला महत्व दिले आहे. या दृष्टीकोनातून नव्या शैक्षणिक धोरणात ग्रंथालय व ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवा-सुविधेला महत्व प्राप्त झाले आहे.

**ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवा-सुविधा**

साधारणता शैक्षणिक ग्रंथालयातून पुढील प्रमाणे सेवा-सुविधा दिल्या जातात.

१. ग्रंथ, संदर्भ ग्रंथ व इतर वाचन साहित्याची सुविधा.

२. अभ्यासक्रमाची पाठ्य पुस्तके.

३. अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत प्रत्यक्ष –अप्रत्यक्ष सहभाग.

४. विविध भाषेतील वर्तमान पत्र उपलब्ध करून देणे.

५. अद्ययावत माहिती साठी विषयानुसार नियतकालिके उपलब्ध करून देणे.

६. ग्रंथालयात इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून देणे.

७. झेरॉक्स सेवा उपलब्ध असणे.

८. संदर्भ सेवा, माहिती सेवा उपलब्ध करणे.

९. वर्तमान-पत्र कात्रण सेवा उपलब्ध करून देणे.

१०. ग्रंथालयाचे संगणकीकरण करून online सेवा देणे.

११. ग्रंथालयाचे डिजिटल ग्रंथालय करून वाचन साहित्य डिजिटल स्वरुपात उपलब्ध करून देणे.

१२. ग्रंथालय नेटवर्क च्या माध्यमातून सेवा उपलब्ध करून देणे.

१३. स्वतंत्र वाचन कक्ष सुविधा

**नव्या शैक्षणिक धोरणात ग्रंथपालाची भूमिका**

शैक्षणिक ग्रंथालय कोणत्याही प्रकारचे असो, उदा. विद्यापीठीय ग्रंथालय, महविद्यालयीन ग्रंथालय, शालेय ग्रंथालय. या ग्रंथालयातील ग्रंथापालाना आणि ग्रंथालय कर्मचारी यांना ग्रंथालयातील उपलब्ध सेवा-सुविधांचा लाभ वाचकांना करून देण्यासाठी सतत जागरूक राहावे लागते. शाळेतील व महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार आवश्यक माहिती व उपयुक्त वाचन साहित्य वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी सदैव तत्पर राहावे लागेल. शिक्षक व विद्यार्थी यांना त्यांच्या शैक्षणिक संशोधन कार्यासाठी विविध संदर्भ साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी तत्पर राहावे लागेल. आपल्या ग्रंथालयात जर वाचकाला पाहिजे असलेले वाचनसाहीत्य उपलब्ध नसेल तर अन्य ग्रंथालयातून ते उपलब्ध करून वाचकाची गरज पूर्ण करण्याची तत्परता दाखवली पाहिजे. ग्रंथालयातील वाचकांमध्ये वाचनाची सवय निर्माण करण्यासाठी ग्रंथालयात विविध कार्यक्रम, उपक्रम, व वेळोवेळी व्याख्यानाचे आयोजन या संदर्भात केले पाहिजे. ग्रंथालय व तेथील वाचन साहित्याच्या योग्य उपयोगाबाबत वाचकांना माहिती उपलब्ध करून देणे, मनोरंजनात्मक असे वाचन साहित्य, त्यांच्या फुरसतीच्या वेळेत त्यांना उपलब्ध

करून दिले पाहिजे. लहान गावामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाची सोय नसते. अश्या वेळी शालेय ग्रंथालयात सर्वसामान्य, प्रौढ वाचकांच्या योग्य अश्या वाचन साहित्याची व वाचनाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी ग्रंथपालानी पुढाकार घेतला पाहिजे.

**निष्कर्ष**

महाविद्यालयात किंवा शाळेमध्ये अनेकदा इयत्ता व त्यांच्या काही तुकड्या असे वर्ग असतात. त्यापैकी प्रत्येक वर्गासाठी आठवड्यातून एक तरी ग्रंथालय तास असावा आणि त्या वेळात विद्यार्थ्यांना पुढील सेवा दिल्या जाव्यात. विद्यार्थ्यांना व त्यांच्या शिक्षकांना त्या ग्रंथालातील वाचन साहित्याच्या व गरजेनुसार इतरही ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सहजपणे उपयोग करता यावा. विद्यार्थ्यामधील वाचनाच्या सवयीस उत्तेजन देवून त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा वाढविण्यास मदत करावी. ग्रंथालयातील कोणत्याही वाचन साहित्याचा उपयोग करण्याची संधी सर्वांनाच द्यावी. त्यावेळी ग्रंथालयातील कर्मचाऱ्यानी देखरेख करावी. अनेक प्रकारच्या वाचन साहित्यातून, अभ्यासासी संबंधित माहिती शोधण्यास विद्यार्थ्यांना मदत करावी. काही शिक्षक स्वतः संशोधन करतात. तर काही विद्यार्थ्यांना विविध स्पर्धासाठी किंवा निबंधासाठी मार्गदर्शन करतात. त्यांच्या अश्या कामात ग्रंथालय कर्मचाऱ्यानी साहाय्य करावे. महाविद्यालय व शाळेतील ग्रंथपालानी व ग्रंथालय कर्मचाऱ्यानी आणि त्या संस्थेतील शिक्षक यांनी सहकारानी काम केले पाहिजे आणि नव्या शिक्षण तंत्राचे आव्हान, नव्या नव्या तांत्रिक युक्त्यांच्या सहाय्याने स्वीकारले पाहिजे, तरच शैक्षणिक ग्रंथालय पद्धतीतील हा नव्या शैक्षणिक धोरणाचा टप्पा यशस्वी होईल.

**ग्रंथसूची**


१. भट, शरद गो. (२००८). इलेक्ट्रानिक माहिती साधने (प्रथम आवृत्ती). नागपूर: पिंपळापुरे बुक प्रकाशन.

२. राविकीर्ती, आल्लमप्रभू. (२००६). शिक्षणातील माहिती तंत्रज्ञान (द्वितीयावृत्ती). सातारा: सागर प्रकाशन.

३. जैन, प्रकाश., डाखोळे,पी., देशपांडे, द., खेडकर, अ. (२००९). सुलभ ग्रंथालयशास्त्र (द्वितीयावृत्ती). नागपूर: विश्व प्रकाशन.

४. पवार, एस.पी., बडकते, स., पवार, आर.जी., जाधव, सु. (२०१२). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र (चौथी आवृत्ती). कोल्हापूर: फडके प्रकाशन.

५. काळे, किशोर. (२०१०). माहिती सेवा व साधने (प्रथम आवृत्ती). नागपूर: विश्व प्रकाशन.

६. नरगुंदे, रेवती. (२०१३). ग्रंथालय आणि सामाजिक विकास (प्रथम आवृत्ती). पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन.

७. कोण्णूर, सुजाता., कोण्णूर, अनुप., कोण्णूर, मेखला. (२००९). माहिती तंत्रज्ञान (प्रथम आवृत्ती). पुणे: डायमंड पब्लिकेशन.